# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः10.09.2024 वारःमंगळवार

---

1. भारत आणि युएई यांच्यात अणुऊर्जा आणि पेट्रोलियमसह विविध क्षेत्रातील पाच करार
2. कर्करोगांच्या औषधांवरील जीएसटी 12 टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय
3. देशात यंदा खरीपाच्या पेरणी क्षेत्रात लक्षणीय वाढ
4. वाहनांच्या सुट्या भागांची निर्यात 2030 पर्यंत 100 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट आणि
5. महाराष्ट्रातील विदर्भात अतिवृष्टीचा इशारा

**भारत-युएई**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती अर्थात युएई यांच्यात काल अणुऊर्जा आणि पेट्रोलियमसह विविध क्षेत्रातील पाच करार करण्यात आले. यामध्ये एमिरेट्स न्यूक्लियर एनर्जी कंपनी आणि भारतीय अणु ऊर्जा महामंडळ यांच्यातील बरकाह अणुऊर्जा प्रकल्पाचं व्यवस्थापन आणि देखभालीच्या सामंजस्य कराराचा समावेश आहे. तसंच अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांच्यात दीर्घकालीन एलएनजी पुरवठा करारावरही स्वाक्षरी करण्यात आली. ॲडनॉक आणि इंडिया स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह यांच्यातही सामंजस्य करार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अबू धाबीचे युवराज शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यात काल नवी दिल्लीत झालेल्या चर्चेनंतर या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. भारत-यूएईमधील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीमध्ये अलीकडच्या वर्षांत झालेल्या भरीव प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं आणि द्विपक्षीय सहकार्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये भागीदारी आणखी वाढवण्याबाबत चर्चा केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल दुपारी राष्ट्रपती भवनात अबुधाबीच्या युवराजांची भेट घेतली. भारत आणि युएई मधील ऐतिहासिक मैत्रीपूर्ण संबंधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. दरम्यान, अबु धाबीच्या युवराजांनी काल राजघाट इथं भेट देऊन महात्मा गांधीजींना आदरांजली अर्पण केली.

**जीएसटी**

कर्करोगाच्या उपचारांचा खर्च कमी करण्याच्या उद्देशानं वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी परिषदेनं कर्करोगांच्या औषधांवरील 12 टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं काल झालेल्या 54 व्या परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी आणि राज्यांचे अर्थमंत्रीही उपस्थित होते. निवडक खाद्यपदार्थांवरील जीएसटीही 18 टक्क्यांवरून 12 टक्के करण्यात आला आहे, असं या बैठकीनंतर सीतारामन यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. आयुर्विमा आणि आरोग्य विम्यावरील कराचे दर कमी करण्याबाबत विचार करण्यासाठी मंत्र्यांचा एक गट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, केंद्र आणि राज्य सरकारांनी स्थापन केलेल्या विद्यापीठांना संशोधनासाठी दिलेला निधी आणि ज्यांना प्राप्तिकर सवलत मिळाली आहे त्यांना जीएसटीमधून सूट देण्यात आली असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**खरीप-पेरणी**

देशात यावर्षी खरीप पीक पेरणीत लक्षणीय प्रगती झाली आहे, एकंदर पेरणी क्षेत्र 1 हजार 92 लाख हेक्टरच्या पुढं गेलं आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत अंदाजे 1 हजार 69 लाख हेक्टर पेरणी झाली होती. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं काल

खरीप पिकांखालील क्षेत्राचा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात ही माहिती देण्यात आली आहे. भाताचे पेरणी झालेले क्षेत्र 409 लाख हेक्टरवर पोहोचले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीत ते सुमारे 393 लाख हेक्टर होते. कडधान्य लागवड 117 लाख हेक्टरवरून 126 लाख हेक्टरपर्यंत वाढली आहे. भरड धान्याची पेरणी 189 लाख हेक्टरवर, तर तेलबियांची पेरणी 193 लाख हेक्टरवर झाली आहे. उसाचे पेरणी क्षेत्र 57 लाख हेक्टरवर पोहोचले आहे.

**भाषा-शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसदीय राजभाषा समितीच्या अध्यक्षपदी एकमतानं फेरनिवड झाली आहे. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर राजभाषा संसदीय समितीची पुनर्रचना करण्यासाठी काल नवी दिल्लीत समितीची बैठक झाली. त्यात ही निवड करण्यात आली. सर्व सरकारी यंत्रणांमध्ये 2047 पर्यंत भारतीय भाषांचा वापर केला जाण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेनं सरकार वाटचाल करत असल्याचं शहा यांनी या निवडीनंतर सांगितलं. अमित शहा यांनी 2019 ते 2024 या कालावधीत समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं होतं. राजभाषा विभाग एक सॉफ्टवेअर विकसित करत असून, त्याआधारे आठव्या सूचीतील सर्व भाषा स्वयंचलितपणे अनुवादित केल्या जातील, असंही शहा यांनी यावेळी सांगितलं.

**जपान-गणेश**

विविध देशांमध्ये कशारितीने गणेशोत्सव साजरा केला जातो हे तिथं राहात असलेल्या नागरिकांकडून आपण जाणून घेत आहोत. जपानमधील गणेश उत्सवाबाबत टोकियोत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या प्राची धर्मे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं....

**स्वयंचलित-सुटेभाग**

देशातून होणारी वाहनांच्या सुट्या भागांची निर्यात 2030 पर्यंत 100 अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट गाठेल असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला आहे. ते काल नवी दिल्ली इथं वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या उद्योग संघटनेच्या 64 व्या वार्षिक अधिवेशनात बोलत होते. मेक इन इंडिया उपक्रमासाठी आणि वाहन उत्पादन उद्योगासाठी जागतिक वन-स्टॉप सोल्यूशन बनण्यास मदत केल्याबद्दल त्यांनी या उद्योजकांचं कौतुक केलं. देशाला 2047 पर्यंत विकसित देशांच्या यादीत नेण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे यावर त्यांनी भर दिला आणि सामूहिक बांधिलकीच्या बळावर देशाच्या विकासाचा आलेख वरच्या दिशेने जाईल, असा विश्वासही व्यक्त केला. इलेक्ट्रॉनिक्स आणि वाहन उद्योगामध्ये सरकारनं सुरू केलेल्या उत्पादन-संबंधित प्रोत्साहन योजना अधिक चांगली कामगिरी करत आहेत, असं यावेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांनी सांगितलं.

**मंकीपॉक्स**

देशात एका नागरिकाला मंकीपॉक्स आजाराच्या एमपॉक्स क्लेड दोनची लागण झाली असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. या तरुण व्यक्तीनं मंकीपॉक्सचा प्रसार झालेल्या देशातून प्रवास केला असल्यानं त्याला हा संसर्ग झाला असल्याचं निष्पन्न झालं आहे. सध्या त्याला विलगीकरणात ठेवण्यात आलं असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे. सर्वसामान्य लोकांना कोणताही धोका असल्याचे कोणतेही संकेत नाहीत. सार्वजनिक आरोग्याला धोका उद्भवू नये यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेतली जात असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. देशात जुलै 2022 पासून नोंदवल्या गेलेल्या 30 प्रकरणांप्रमाणेच हे प्रकरण वेगळे असून जागतिक आरोग्य संघटनेनं नमूद केलेल्या मंकीपॉक्सच्या क्लेड एकशी संबंधित सार्वजनिक आरोग्य आणीबाणीशी संबंधित नाही, असंही आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**नागरी-विमान**

भारताच्या वतीनं नवी दिल्ली इथं 11 आणि 12 सप्टेंबर रोजी नागरी विमान वाहतूकविषयक दुसऱ्या आशिया-प्रशांत मंत्रीस्तरीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. देशांतर्गत विमान वाहतुकीत शाश्वत वाढ करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. विमानांची

देखभाल, दुरुस्ती सेवा, मालवाहतूक क्षेत्रात भारत स्वतःला एक प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित करत असून, जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ म्हणून विकसित होत आहे, असंही त्यांनी सांगितलं. नव्या पर्यावरणपूरक विमानतळांचा विकास आणि देशांतर्गत विमान वाहतुकवाढीला चालना देणाऱ्या उडानसारख्या प्रगतीशील धोरणांबाबतही नायडू यांनी माहिती दिली.

## कोळसा

कोळसा मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या कंपन्यांच्या समाजिक जबाबदारी उपक्रमांचा सहामाही आढावा घेण्यासाठी काल कोळसा मंत्रालयातर्फे नवी दिल्ली इथं एक बैठक घेण्यात आली. या उपक्रमांचा समुदायांवर पडणारा त्यांचा प्रभाव आणि सरकारच्या मार्गदर्शक तत्वांशी सुसंगतता या मुद्यांवर त्यांच्या प्रगतीचं मूल्यांकन करण्यात आलं. आरोग्यसेवा, शिक्षण, पर्यावरण, कौशल्य विकास आणि उपजीविका यांसारख्या क्षेत्रातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली. कोळसा खाणींच्या क्षेत्रात राहणाऱ्या स्थानिक लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष केंद्रित करून खात्रीशीर परिणाम देणाऱ्या उपक्रमांच्या जलद अंमलबजावणीच्या गरजेवर मंत्रालयानं भर दिला.

## हवामान इशारा

महाराष्ट्रातील विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.